Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - IV Issue-III MARCH 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार व सामाजिक परीवर्तनाचे अर्थशास्त्र

**डॉ. सुभाष प्रभू राठोड**
'अर्थशास्त्र विभाग प्रमुख'
प्रतिष्ठाण महाविद्यालय पैठण,
ता. पैठण, जि. औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार संदर्भात भारतातील अर्थव्यवस्था कशी असावी या संदर्भात भारतातील आर्थिक नियोजन, आर्थिक धोरण योग्य आहे ? पण अंमलबजावणी व ज्याप्रकारे नियंत्रण असावे हे दिसत नसल्यामूळे सध्या भारतीय अर्थव्यवस्था डबघाईत आलेली दिसते. चलन निर्मिती कशी असावी त्यासंदर्भात चलन निर्मितीवर मर्यादा असल्या पाहीजे जर मर्यादा नसल्यास चलनात वाजवीपेक्षा जास्त वाढ होईल, त्यामुळे भाववाढ होते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुवर्ण परिमाणाचा स्विकार केला की, त्यामुळे किंमती स्थिर राहतील. रुपयाचा प्रश्न या पुस्तकात भारताच्या रुपयाची उत्क्रांती व ऐतीहासीक मिमांसा सादर केली आहे. सामाजीक कल्याण म्हणजेच व्यक्तीगत कल्याण होय म्हणजेच समाजातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळाल्यास त्याला उदरनिर्वाहा इतके उत्पन्न मिळाल्यास त्याचा विकास होईल, म्हणजे आर्थिक विकास वाढेल. म्हणजेच सर्वांचे कल्याण झाल्यास व्यक्तीचे कल्याण सहज होते. याचे मूख्य कारण म्हणजे आर्थिक धोरण, संपत्तीचे वाटप, सरकारी औद्योगीक क्षेत्र, कल्याणकारी राज्य, आर्थिक नियोजन, मुद्राविषयक धोरण, राजकोषीय धोरण, किंमतविषयक धोरण, आर्थिक विचार, कर आकारणी, तुटीचे अर्थसंकल्प व नियंत्रण याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

विकसित देश, विकसनशील देश, अविकसीत देश या तीन गटापैकी भारत देश विकसनशील देशाचा गटात येतो असे प्रचलीत आहे आणि लवकरच भारत देश महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे असा देखील दावा करतात. सरकारी धोरणात बहुसंख्यांक लोकांना प्रतिनिधीत्व असणे आवश्यक आहे. कारण भारतात जातीव्यवस्था आहे, तर जातीचे प्रतिनिधी प्रशासकीय धोरणात संख्येनुसार नसल्यामुळे विकसनशील याच गटामध्ये येतो.

भारतात बेरोजगारीची सर्वात मोठी समस्या मांडली जाते. सध्या भारतात १२ ते १८ कोटी सुशिक्षित बेरोजगार सध्या भारतात आहेत.[१] संशोधन करुन भारतात नवीन वस्तू तयार करण्याची यंत्रणा निर्माण केल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. बेरोजगारी दूर करण्यासाठी विदेशी कंपन्यांना आमंत्रण देणे हे कितपत योग्य आहे ? विदेशी कंपनी येण्याचा मार्ग म्हणजे संसदेत कायदा करुन खुला केला जातो ? जनतेचा प्रतिनिधी याला काही बोलत नसावे ? कारण ते देखील हात वर करुन कायद्याला संमत्ती देतात. १९९१ चे धोरण हे नवीन आर्थिक धोरण म्हणून चर्चेत आहे. या माध्यमातून विदेशी कंपनींना जमीन विकत घेण्याचा व त्या ठिकाणी उद्योग उभारण्याची परवानगी देण्यात आली. जागतीकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण हे धोरण लोकशाहीला घातक आहे.

## १) चलन विषयक विचार :-

अर्थशास्त्राविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या 'Problem of Rupee' या ग्रंथात सविस्तर माहिती दिली आहे. रुपयाचा प्रश्न या ग्रंथात भारताच्या रुपयाची ऐतिहासीक माहिती सादर करताना त्यावेळी सुवर्ण परिमाण स्विकारावे की, सुवर्ण विनिमय परिमाण स्विकारावे यात बरेच अर्थतज्ञात संभ्रम निर्माण झाला होता. प्रा. केन्स यांनी सुवर्ण विनिमय परिमाणाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाण हे लवचिक असल्याने भविष्यकालीन अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विरोध केला की, सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहूच शकत नाही, यामध्ये लवचिकता आहे. परंतू यामध्ये चलन निर्मितीवर कोणत्याही मर्यादा राहणार नाहीत. चलनात जर वाजवीपेक्षा जास्त वाढ झाली तर त्यामुळे भाववाढ होते. परिणामी असे होईल की, रुपयांची किंमत कमी होईल. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट केले की, सुवर्ण परिमाणमध्ये वस्तूच्या किंमती

कशा स्थिर राहतील असे प्रतिपादन करताना रुपयाच्या स्थैर्यासाठी रुपयाच्या सुवर्णात परिणामकारक असणे आवश्यक आहे. रुपयाचा बऱ्याच अर्थाने स्थिर करावयाचा असेल तर "निश्चित मर्यादा असलेला अपरिवर्तनीय रुपया हाच स्थिर करण्याचा सुरक्षित उपाय आहे." यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुवर्ण परिणामामध्ये भारतातील वस्तूच्या किंमती कशा स्थिर होत्या याचे ऐतिहासिक पूरावे दिले.[२] नविन रुपयांची नाणी काढण्याचा अधिकार फक्त सरकारकडेच असावा आणि जरी रुपयाचा जुना साठा काही काळाकरीता पुरेल एवढा असला तरी अस्तित्वात असलेल्या नाण्याव्यतिरिक्त नविन नाणी तयार करण्याकरिता कायद्याची संमती असावी.[३] डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांनी रुपयाची समस्या हा प्राब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजीन ॲड इट्स सोल्युशन हा अर्थशास्त्रीय प्रबंध लंडन स्कूल ऑफ एकॉनामिक्सला १९२३ साली डी.एम.सी. करिता सादर केला होता. त्यासाठी त्यांना कोलंबीया विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयात पी.एच.डी. ही पदवी बहाल करण्यात आली. प्रबंधाला अर्थशास्त्र विभागाचे प्रमूख आणि गाढे अभ्यासस प्रोफेसर एडवीन कॅनान हे त्यांचे मार्गदर्शक होते. ह्या प्रबंधावर त्यांना डी.एम.सी. ह्या पदवीने सन्मानीत करण्यात आले. त्यांचा हा ग्रंथ १९२३ साली पुस्तक रुपाने पी.एस. कींग ॲड सग ह्या कंपनीद्वारे प्रकाशित केला गेला. तसेच या पुस्तकाच्या प्रती लवकरच संपूष्टात आल्या, त्यामुळे या पुस्तकाचे पुर्नमुद्रण १९४७ साली करताना ह्या पुस्तकाला **"हिस्ट्री ऑफ करंसी ॲड बँकींग"** हे नाव यावेळी दिले. त्याचे दोन खंडातून विभागणी केली. प्रथम खंडात **'प्राब्लेम ऑफ रुपी'** आणि दुसऱ्या खंडात **हिस्ट्री ऑफ करंसी ॲड बँकींग** असे राहील हे घोषीत करण्यात आले. परंतू हा दुसरा खंड कामाच्या व्यापामुळे प्रकाशित झाला नाही. याबद्दल डॉ.बाबासाहेब नेहमी खेद व्यक्त करीत असतं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सत्य प्रतिपादीत करण्याकरीता परिणामाची पर्वा न करता आपले मत नोंदवित असतं, रुपयाचा प्रश्न या ग्रंथात भारताच्या रुपयांची उत्क्रांती व ऐतिहासिक मिमांसा सादर केली आहे.

## २) सामाजिक कल्याण :-

व्यक्तिगण कल्याण हे व्यक्तीच्या मिळणाऱ्या समाधानावर अवलंबून असते. प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात **आर्थिक वस्तू व आर्थिक सेवांचा** उपभोग घेत असतो. तसेच प्रत्येक व्यक्ती आपल्या गरजा भागविण्यासाठी कोणत्या आर्थिक वस्तू व आर्थिक सेवांची निवड करते, ह्यावर अवलंबून असते. निवड करत असतांना त्यांना पसंती क्रमांक महत्वाचा असतो. परंतीक्रमाच्या आधारे वस्तू व सेवांची निवड करतो, जेव्हा त्याला कोणत्या वस्तू पासून जास्त समान मिळते, त्याला व्यक्तिगत कल्याण म्हणतात. त्याच प्रमाणे समाजात राहणाऱ्या सर्व व्यक्तीपासून समाज बनलेला असतो. परंतू भारतात जातीव्यवस्था असल्यामुळे जाती एकत्र केल्यास समाज बनतो. भारतात एकूण ६००० मुख्य जाती आहेत. यांना जोडल्यास समाज तयार होईल. त्यावेळी समाजात राहणाऱ्या सर्व व्यक्तींना वस्तु व सेवांच्या उपभोगापासून प्राप्त होणाऱ्या समाधानाची एकूण बेरीज म्हणजे सामाजिक कल्याण होय. भारतातील सामान्याच्या सामान्य व्यक्तीला व समाजातील प्रत्येक व्यक्तीचा जर सामाजीक कल्याणात वाढ होत असेल तरच आर्थिक विकास होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या कल्याणाचा विचार करताना त्यांचा एक आग्रह होता की, समाजामध्ये संपत्तीचे वाटप समानतेने झाले पाहिजे.[४] यावरुन असे लक्षात येते की, भारतात जाती व्यवस्था आहे. पण जातीशास्त्र शिकवले जात नाही. कारण जातीशास्त्र शिकवल्यास भारतात एकूण मुख्य जाती किती आहेत. जातीची उत्पत्ती कशी झाली. आजही गावा-गावात शहरात व वाडी तांड्यात जातीव्यवस्था परखडतेने वावरताना दिसतात, पण त्याचा अभ्यासक्रमात कुठेही दिसत नाही, ही एक फार मोठी खंत आहे. जातीशास्त्राचा अभ्यास झाल्यास त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत काय होते. त्यांना शिक्षणासाठी, लिहीण्यासाठी, बोलण्यासाठी कोणी बंदी घातली ? यावर अभ्यास झाल्यास समाजाचे कल्याण कसे होईल हे लक्षात येईल. डॉ.बाबासाहेब यांना भारताचा आर्थिक विकासाचा अभ्यास असल्यामुळे त्यांची महत्वाची भुमिका म्हणजे देशातील संपत्तीचे समान वाटप झाले पाहिजे. समान वाटप झाल्यास समाजाचे कल्याण होईल. अशावेळी आर्थिक विकासही होईल.

## ३) आर्थिक विचार :-

अर्थशास्त्राचे जनक 'ॲडम स्मिथ' आहेत. त्यांनी आर्थिक विचार संबंधी मांडणी करतांना मजूरांना योग्य वेतन मिळाला पाहीजे, त्यामुळे सामाजिक कल्याण होईल. त्यांनी 'राष्ट्राची संपत्ती' हा ग्रंथ लिहीला.[५] संपत्तीचे विभाजन, उत्पादन, विनियम, लोकसंख्या, सार्वजनिक आय-व्यय इत्यादी गोष्टीचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'स्वतंत्र मजूर पक्षाच्या' जाहीरनाम्यात त्यांचे आर्थिक विचार आढळतात. रुपयाचा प्रश्न आहे.[६] तसेच भारतीय राजस्व संबंधीचे विचार, भारतीय शेती संबंधी विचार जे मांडले आहेत, ते अक्षरशः आज सुध्दा लागू पडतात. आजच्या काळात चलन

निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे. चलनवाढीचा परीणाम म्हणून भाववाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. जी भूमिका मांडली होती ती आज खरी ठरत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार घटक राज्यांच्या आणि त्यासाठी लागणारा पैसा उभारण्याची जबाबदारी मात्र केंद्र सरकारची त्यामुळे घटक राज्यांची मागण्या वाढत जात असतं. अशा वेळी मागण्या योग्य आहेत किंवा नाहीत ही तपासणी यंत्रणा योग्य पध्दतीची नसल्यामुळे गैरवाजवी मागण्या मान्य कराव्या लागल्या. याचा परिणाम केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तुट प्रचंड प्रमाणात वाढत केली. म्हणून १८७१ पासून केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यासाठी वेगवेगळे अर्थसंकल्प करण्याची पध्दत प्रथमच अस्तित्वात आली. यासाठी पुढे डॉ.बाबासाहेब म्हणतात की, सामुहिक शेती पध्दतीचा स्विकार केल्यास उत्पादकता आणि कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करणे शक्य आहे. त्यांच्या मते सामाजिक अन्याय व आणि शोषण सामुदायीक शेतीमध्ये होत नाही असे विचार मांडले. त्यांच्या मते आधुनिक औद्योगिकरणाचा पुरस्कार केला. परंतू औद्योगिकरणातून विषमता, संपत्तीचे केंद्रीकरण, मक्तेदारी यांच्यात वाढ होवू नये. विशेष करुन मुलभूत स्वरुपाचे उद्योग सरकार चालवेल. सरकारने उद्योग सुरु करण्यासाठी महामंडळे निर्माण करावीत.

आज स्थिती अशी का निर्माण झाली असावी चलन फुगवटा करणे हे भारतीय जनतेसाठी फार मोठा धोका आहे. परंतू सरकार चलन पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढवत आहे. उद्योग सुरु करावयाचे असेल तर सरकारी काही उद्योग असावे व महामंडळ स्थापन करावे, यामध्ये १९९१ ची नविन आर्थिक धोरण हे मुलनिवासी बहुजन समाजाला फार मोठे घातक आहे.

## ४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार :-

डॉ. बाबासाहेब हे शेती विषयी विचार मांडताना भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व सर्वाधिक आहे. याबाबत सांगतात की, शेतीचा विकास झाल्याशिवाय सुधारणा होणार नाही.[७] म्हणजेच शेतीचा आकार लहान-लहान असल्याने शेतजमीनीचे विभाजन व विखुरीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून शेतीच्या उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात प्रतिकुल परिणाम झालेला आहे. थोडक्यात लहान-लहान धारक जमीनीचे एकत्रिकरण केल्यास उत्पादकता वाढते. जमीनीचे क्षेत्रफळ सार्वजनिक असल्यास काळजी घेतली जाईल. जमीन क्षेत्राच्या धारणात वाढ करणे म्हणजे जमीनीवर भांडवल व उत्पादनाच्या घटकात वाढ करणे होय. डॉ.बाबासाहेब म्हणतात की, शेती हा उद्योग राज्य शासन चालवतील. लागवडीखाली नसलेली जमीन भुमिहिन लोकांना सरकारने द्यावी. भुमिहिन लोकांना जात, धर्म न पाहता, तसेच भेद न करता, शेती करण्यासाठी द्यावी. त्यांच्या मते सामुहिक शेती पध्दतीचा स्विकार केल्यास उत्पादकता आणि कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करणे शक्य आहे.

## ५) आर्थिक विकासासंबंधी विचार :-

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये भांडवल व इतर आर्थिक घटकांना अधिक महत्व आहे. आर्थिक विकासाकरिता भांडवलाची उपलब्धता ही सुध्दा अट आवश्यक आहे. तसेच भांडवलाशिवाय इतर अनेक आर्थिकेत्तर घटकांच्या प्रभावामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे स्वरुप व वेग निश्चित होत असतो.[८] जगात कोणतेही राष्ट्र असो त्यापैकी ज्या राष्ट्राचे आर्थिक नियोजन व आर्थिक व्यवस्था यांची अंमलबजावणी व नियंत्रण असेल तर त्या राष्ट्राचा आर्थिक विकास होणार. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक व्यवस्था, आर्थिक विकास आणि नियोजन इत्यादी क्षेत्रात लिखान केले. सन-१९४२ ते १९४६ या कालखंडात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रम, जल व विद्युत विभागाचे मंत्री होते. सरकारने या योजनेचे उद्दिष्ट व भुमिका ठरविण्यासाठी एक पाच सदस्यीय समिती गठीत केली होती. त्यात श्रम, जल व विद्युत मंत्रालयात ही 'धोरण समितीचे' ते अध्यक्ष होते. चर्चेत डॉ.बाबासाहेब लिखीत सांगायचे शेती हा आजचा मुख्य व्यवसाय आहे व तो दिर्घकाळ चालू राहणार आहे. शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेती फायदेशीर होणे आवश्यक आहे. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या व कुटूंबे कमी करण्यासाठी देशातील उद्योगाचा सर्वांगीन विकास करणे महत्वाचे आहे. वाढत्या औद्योगिकरणामधून शेती व उद्योगाचा समतोल विकास होईल.[९] यासाठी जनतेला आवश्यक घटकाची सरकारतर्फे अंमलबजावणी होईल. औद्योगिकरणासाठी विद्युतशक्ती, सिंचन, रस्ते, दळण-वळन वाहतुक आणि तांत्रिक मनूष्यबळ अशा आवश्यक सेवासुविधासाठी विकास आवश्यक असतो. अशा वेळी दरडोई उत्पन्न वाढेल, गुंतवणुक वाढल्यास मजूरदार वर्ग व ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक वर्गाला काम मिळेल त्यांच्या उत्पन्नत भर पडल्यास अशावेळी व्यक्तीचे कल्याण होत असल्यास आर्थिक विकास होईल.

राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व प्रशासकीय इत्यादी क्षेत्रात विकास होणे अपेक्षित आहे. एखाद्या देशाचा आर्थिक विकास किती झाला ? ते तेथील जनतेच दरडोई उत्पन्नावर ठरतो.

मानव विकास निर्देशांक (Human Development Indix) मनुष्याच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी तज्ञांकडून विशेष निकष ठरविण्यात आले आहेत. मनुष्याच्या विकासामध्ये कोणत्या बाबी महत्वाच्या आहेत. यावरुन निर्देशकाची सिमारेषा ठरवली जाते. शिक्षण, आरोग्य, आर्युमान, साक्षरता या सर्व बाबींचा विचार करुन मानवी विकास ठरविला जातो. यामध्ये एकूण देशाच्या क्रमवारीत 'मानव विकास निर्देशांक' भारताचा १३४ वा क्रमांक आहे.[१०] यावरुन स्पष्ट होते. भारतात मानवी जीवन अत्यंत निकृष्ठ दर्जाचे आहे. दरडोई उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, दळण-वळण्याच्या सुविधा, रोजगार इत्यादी बाबींची वाईट स्थिती आहे. नियोजन मंडळाने मनुष्यास एक दिवसाला प्रत्येक व्यक्ति, दरडोई २४०० कॅलरीज आवश्यक आहे. या कॉलरीज (ऊर्जा) मिळण्यासाठी व्यक्तिस ४९ रुपये पुरेसे आहे असे १९७३-७४ च्या अभ्यास गटाने म्हटले आहे. 'अर्जुन सेन गुप्ता' रिपोर्टच्या निकषानुसार भारतात १२१ कोटी लोकांपैकी २९ कोटी लोकांचे दर दिवसाला उत्पन्न ६/- रुपये आहे. म्हणजेच १८०/- रुपये महिना, २६ कोटी लोकांची ११/- रुपये प्रतिदिन कमाई म्हणजेच ३३०/- रुपये महिना आणि २८ कोटी लोकांची प्रतिदिन कमाई २०/- रुपये म्हणजे ६००/- रुपये महिना आहे.[११] म्हणजेच याचे विश्लेषण केल्यास भारतात १२१ कोटी जनतेपैकी २९ कोटी + २६ कोटी + २८ कोटी = ८३ कोटी लोकसंख्या याचे विवरण खालील प्रमाणे :

| | एकूण लोकसंख्या (कोटीमध्ये) | प्रतिदिन उत्पन्न रुपये |
|---|---|---|
| | २९ | ६/- |
| | २६ | ११/- |
| | २८ | २०/- |
| **एकुण** | **८३** | **३७/-** |

सरासरी उत्पन्न = ३७/३ = १२.३३ रुपये प्रतिदिन म्हणजेच भारतातील १२१ कोटी लोकसंख्येपैकी ८३ कोटी मुलनिवासी बहुजनांची लोकसंख्या सरासरी नूसार प्रतिदिन १२.३३ पैसे एवढे खर्च करतो. ८३ कोटी जनता भुकबळीच्या सिमारेषेवर उभी आहे. भारताची अशी विदारक परिस्थिती असतांना भारताचे अर्थमंत्री अरुण जेटली सांगतात, आर्थिक विकास दरात वाढ होणार आहे. भारतातील जनतेला जिवनावश्यक गरजापासून ८३ कोटी जनाता वंचीत राहात असेल तर विकास दर वाढतो आहे ? यावरुन तर वाटत नाही ?

## ६) नविन आर्थिक धोरण :-

१९९१ चे नविन आर्थिक धोरण यशस्वी करण्यासाठी (जागतिक बँक), वर्ल्ड बँक मध्ये कार्यरत असणारे अरुण सौरी, शरद जोशी, मनमोहन सिंग यांना भारतात बोलाविण्यात आले. २१ जून-१९९१ प्रधानमंत्री पदाची शपथ घेतली. सरकारी धोरणाला नांव देण्यात आले ते जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण म्हणजे भारताचा विकास होय असा प्रचार करण्यात आला. खाऊजा धोरण बहुजनाच्या विरोधातला आहे. खाऊजा धोरण बहुतांश राष्ट्राने स्विकारलेले आहेत. परंतू ते राष्ट्र विकसीत आहेत. त्या राष्ट्रात 'खाऊजा' योग्य आहे. विकसनशील राष्ट्रात 'खाऊजा' धोरण योगय नाही. हे धोरण लागू करणे म्हणजे संविधानाच्या विरोधात आहे.

### A) खाजगीकरण (Privatisation) :

सरकारी संविधानीक उद्योग एखाद्या खाजगी मालकीस देणे म्हणजे खाजगीकरण होय. सरकारी संस्था संविधानीक तत्त्वावर चालत असतात. एस.सी./एस.टी./ओ.बी.सी. शासन-प्रशासनामध्ये पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही. उदा.मुंबई मध्ये 'सेंटार हॉटेल' याची दर्शनी किंमत १००० कोटी रुपये आहे. या हॉटेलमध्ये ५१.००% भाग (शेअर्स) लोकांचे होते. नंतर हे हॉटेल एका नातेवाईकाला ८३ कोटी रुपयांना विकण्यात आले. नंतर हेच हॉटेल ११५ कोटीला विकले. तिसऱ्या व्यक्तीला २०० कोटीला विकले. तिसऱ्यांने ते हॉटेल ६५० कोटीला विकले.[१२] याला म्हणतात भांडवलाचे नफेखोरीचे खाजगीकरण यामुळे कोट्यावधी लोक बेरोजगार झाले आहेत.

**B) उदारीकरण (Liberlization) :-**

उदारीकरण म्हणजे उदार असणे. सरकारी मदत देऊन त्यांच्या हिताचे संवर्धन करणारी निती म्हणजे उदारीकरण होय. भारताची आर्थिक सत्ता बहुराष्ट्रीय कंपन्याकडे सुपूर्द करणारी यंत्रणा तयार होत आहे. भारतात १६ व्या शतकात एक इस्ट इंडिया कंपनी भारतात आली. भारत देशास गुलाम बनविण्यात इस्ट इंडिया कंपनी यशस्वी झाली. त्याच प्रमाणे भारतात बहुराष्ट्रीय कंपनीने भारतीय अर्थव्यवस्थेवर आपला कब्जा केला. भूसंपत्ती, जलसंपत्ती, शेतीतील कच्चा माल, मोल्यवान खनिज धातू इ. लूट इस्ट इंडिया कंपनीने केलेली आहे. सरकारने उदारीकरणाचे धोरण स्विकारले. काळा पैसा कोणाकडे आहे ? याचा फक्त प्रचार होतो. परंतू त्याची आकडेवारी सरकार जाहीर करीत नाही ? बेहिशोबी मालमत्ता बाळगणाऱ्या चोरांना अभय देतात. त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्याऐवजी त्यांना अंतःकरणाने माफ केले जाते ? उद्योगपतींनी ५८,२०० कोटी रुपयांचे सरकारी कर्ज बुडविले तरी देखील सरकारने कोणतेच पाऊल उचलेले नाही. जर एखाद्या शेतकऱ्यांचे १०,०००/- रुपये कर्ज थकले तर घराचा लिलाव केला जातो.[१३] यावरुन असे लक्षात येते की, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे भारतातील सर्वसामान्य जनता अधिक गरीब होत आहे, तर श्रीमंत व्यक्ती अधिक श्रीमंत होत आहे.

**C) जागतीकीकरण :-**

जागतीकीकरण म्हणजे विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांना आमंत्रण देऊन जागतीक बाजारपेठ निर्माण करणे. जागतिकीकरण हे विकसीत देशासाठी फायदेशीर असते. अविकसीत व विकशनशील देशासाठी जागतिकीकरण फायदेशीर नसते. भारत हा विकसनशील देश आहे. तरी देखील जागतीक व्यापार संघटनेच्या (WTO) दबावाला बळी पडून सदस्य राष्ट्र भारताने स्विकारले. भारतात कच्चा माल मोठ्या प्रमाणात आहे. जागतिकीकरणात कोणत्याही देशात जाऊन बाजारपेठ मिळविता येते. सन-१९९१ पर्यंत भारतात समाजवादी अर्थव्यवस्था असल्यामुळे सरकारचे नियंत्रक होते. नविन आर्थिक धोरण, मुक्त अर्थव्यवस्थेमुळे १९९१ च्या धोरणामुळे प्रधानमंत्री नरसिंह राव आणि अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांच्या धोरणाने समाजवाद अर्थव्यवस्था संपूष्टात आली. बनिया व उद्योगपती भांडवलदार मूठभर लोकांचे हितसंवर्धन करणारी भांडवलशाही अर्थव्यवस्था आणण्याचा प्रयत्न केला. म्हणून जागतिकीकरण हे भारताचा तमाम मूलनिवासी बहुजनासाठी मृत्यूची घंटा आहे.

### ७) SEZ व FDI हे संविधानाच्या विरोधातील धोरण :

**A) SEZ (Special Economic Zone) विशेष आर्थिक क्षेत्र :-**

भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी स्थापन केलेले विशेष क्षेत्र होय. अशी व्याख्या सेझची भारतभर गवगवा करण्यात आली. चीनमध्ये झालेल्या आर्थिक प्रगतीमुळे जगात मानाचे स्थान मिळाले आहे. तेथील विकास दर १३ टक्के आहे. चीन हा साम्यवादी देश आहे. तेथे श्रेष्ठत्व कनिष्ठत्व माननारी विचारधारा नाही. तेथे जनता सर्व धर्म आहे. सर्वांना समान न्याय हक्क मिळावा अशी विचारधारा असणारी यंत्रणा असल्याने तेथील विकासदर १३ टक्के पर्यंत गेला आहे.

भारतीय समाजरचना वर्णव्यवस्थेवर आधारीत आहे. विषमतेवर आधारीत आहे. उच्च-निच्चता आहे. भारतात लोकशाही नसून ब्राम्हणशाही आहे. त्यामुळे खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण, विशेष आर्थिक क्षेत्र, व्हॅट, एफडीआय इत्यादी धोरण पूर्वग्रहदुषित आहेत ?

भारतातील सेझ २३ जून-२००५ ला संसदेच्या पटलावर आला आणि १० फेब्रुवारी-२००६ ला ६८ सेझचा कायदा लागू झाला. त्यावेळी कमलनाथ वाणिज्य मंत्री होते. सेझ २००६ च्या कायद्यानुसार शेतकऱ्यांची जमीन जबरदस्तीने घेण्यात येते. नाहीतर गोळ्या घालून ठार केले जाते. उदा.ओरीसामधील कलींगनगर येथील आदिवासी जमीन देण्यास नकार देतात तर त्यांना काही लोकांना ठार करण्यात आले.[१४] यामुळे लक्षात येते की, सेझ किती भयानक कायदा आहे. हा कायदा मूलनिवासी बहुजनासाठी विरोधात आहे.

१) सेझ मध्ये ५००० ते ३५००० हेक्टर जमीन असणे.
२) जमीन शोधने (चीनमध्ये फक्त अयोग्य जमीन व जंगल येथे सेझ निर्माण करणे.)
३) विशेष आर्थिक क्षेत्रात देशाचा कायदा लागू असणार नाही. कामगार कायदा, कंपनी कायदा असणार नाही.
४) सेझला १५ वर्षांपर्यंत आयात-निर्यात करात सुट असणार.

५) केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे कुठलेही हस्तक्षेप किंवा नियंत्रण सेझवर असणार नाही.
६) सेझमध्ये विदेशी गुंतवणूकदारांना शंभर टक्के स्वतःची गुंतवणूक करता येईल.
७) या क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तीला स्थानिक सरकार बनविण्याचा अधिकार नाही.
८) सेझ हा विदेशी भू-भाग म्हणून ओळखला जाईल.
९) भारतीय जनतेचा संचार करण्याचा मूलभूत हक्क या सेझमध्ये राहणार नाही.[१५]

एक हेक्टर म्हणजे = २.४० एकर जवळ-जवळ अडीच एकर जमीन. ५००० हेक्टर x २.५ = १२,५०० एकर जमीन ३५,००० हेक्टर x २.५ = ८७,५०० एकर जमीन.

यावरुन लक्षात येते की, भारतीय अर्थव्यवस्था मध्ये सेझ कायदा किती भयानक आहे. एक सेझ स्थापन करण्यासाठी कमीत-कमी १२,५०० एकर व जास्तीत-जास्त ८७,५०० एकर जमीन लागणार भारतात येणाऱ्या काळात ५००० झोन करणार आहेत व भारत महासत्ता बननार आहे असे सांगितले जाते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ५००० झोन झाल्यास मागे राहील का काही ? शेतीचे उत्पादन काय असणार ? भारत महासत्ता कसे बनेल ? समता, स्वतंत्रता बंधूता व न्यायवर आधारीत भारतीय संविधान आहे याच्या विरोधात हे कटकारस्थान भारतात चालू आहे. भारतीय संविधानाच्या विरोधात सेझ, एफडीआय, खाऊजा, धोरण लागू केले आहेत. त्यामुळे मूलनिवासी बहुजन वर्ग अधिक भिकारी बनण्याची वेळ येईल ? कारण सेझ हा विदेशी भूभाग आहे. Sez is 'Foreign Territory' सेझमध्ये भारतीय संविधान लागू नाही. कुठलेही कायदे लागू नाही. केंद्र शासनाच्या संस्था आणि राज्य शासनाच्या संस्था यांना येथे हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. एखाद्या महिलेवर अन्याय झाल्यास पोलीस खात्यात तक्रार करता येणार नाही. त्या क्षेत्राचा मालक टाटा, अंबानी, बिर्ला यांच्याकडे न्याय मागावे लागतील ? सध्या ओबीसी, कुणबी, मराठा, अनुसूचित जाती, जमाती, भटके विमुक्त लिंगायत, मुस्लिम, जैन, ख्रिश्चन यांना न्याय देण्यासाठी भारतीय संविधान आहे. भारत सरकार भारतीय संविधानावर चालतो. भारत सरकार संविधानाच्या विरोधात धोरण आखतात. म्हणून बहुजनाला लाचार बनविणारी निती सरकारची आहे.

**D) FDI (Foreign Direct Investment) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक :-**

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक हे जागतिकीकरणासाठी महत्वाचे आहे. भारतात किरकोळ व्यापार ज्यामध्ये लोक किराणा दुकान, भाजीपाला, इलेक्ट्रॉनिक वस्तू, दुकान, खाद्यपदार्थ, बाजारपेठ, कटींग, कापड दुकान, भौतिक वस्तू इत्यादी व्यवसायाच्या माध्यमाने स्वतःच्या मालकीचे कुटूंबाचा उदर्निवाह भागवण्यासाठी जवळपास भारतात ४ कोटी लोक काम करतात, स्वतःच्या मालकीचे धंदे संपूष्टात येईल. भारतात मॉल पध्दत येवू घातली आहे. प्रत्येक तालुक्यात असे मॉल तयार झाले तर किरकोळ व्यापार करणारे लोग रस्त्यावर येतील. त्यांची रोजी-रोटी बंद पडेल.

जगातील सर्वात मोठी अमेरीकन 'वॉलमार्ट' तेथील जनतेने अशा कंपनीला विरोध केला तेथील वॉलमार्ट बंद पडला. वॉलमार्ट, टेस्को सारखे आंतरराष्ट्रीय सूपर मार्केटमुळे भारतातील लहान दुकानदार दिड ते दोन लोक धोक्यात आले आहेत. एफ.डी.आय. ने विदेशी भांडवलदारांना भारतीय भूसंपत्ती खुली केली आहे. भारत सरकारचे कुठलेही नियंत्रण असणार नाही. भारतातील उच्चवर्णीय भट-बनियाच्या माध्यमातून भारतीय बाजारपेठेचा लिलाव होत आहे.[१६] यावरुन असे लक्षात येते की, एफ.डी.आय. च्या माध्यमाने भारतीय बाजारपेठेत उद्योगपती मालामाल, मध्यमवर्गीय कंगाल आणि लहान दुकानदार नष्ट होणार असे वाटते ?

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या जगद्विख्यातचे विद्यार्थी होते. त्यांनी आर्थिक विचार मांडले ते अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक क्षेत्राच्या प्रत्येक घटकावर अभ्यास केलेला आहे. तसेच आर्थिक नियोजनासाठी कमल नं.११०, १११, ११२ नूसार **"देशाचे वार्षिक बजेट"** तयार करुन त्यानुसार वित्तीय व्यवस्था उत्पन्न व खर्च नियोजन व्हावे असे स्पष्ट केले आहे. भारत हा सर्वात मोठा लोकशाहीचा देश म्हणून ओळखला जातो. साडे-सहा हजार जातींना एकत्र करण्याचा प्रयत्न संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. भारतातील बुध्दीजीवी वर्गाने लक्षात घेतले पाहिजे की, विशेष म्हणजे (अर्जुन सेन गुप्ता रिपोर्ट) भारतात १२१ कोटी लोकसंख्या २०११ नूसार.

भारतात ८३ कोटी लोक भुकबळीच्या सिमारेषेवर आहे. मागील दहा वर्षात एक लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यावरुन अनेक उदाहरण असे आहेत की, सर्वांत महत्वाचे म्हणजे 'ओबीसी' समाजाची जातनिहाय जनगणना केली जात नाही. भ्रष्टाचारात भारत देश, अग्रेसर आहे. महागाई मोठ्या प्रमाणात आहे. सर्वसामान्य जनता त्रस्त आहे. बेरोजगारी उग्र झाली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये विज्ञानवादी अभ्यासक्रम नाही, शिक्षण क्षेत्रात सरकारचे लक्ष नाही, शैक्षणिक क्षेत्र देशाचे भविष्य घडविणारा क्षेत्र आहे.

शिक्षणावर केवळ २.५% खर्च केला जातो. सम्राट अशोकाचा भारत देश जागतिक महसत्ताक देश हाता. तथागत बुध्दाचा देश नालंदा, तक्षशिंला सारखे विद्यापीठ त्यामध्ये एकाच वेळी ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. अमेरीका, इंग्लड, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात अंगणवाडी देखील नव्हती तर भारतात विश्व विद्यालय होते सर्व प्रजा सुखी होती.

भारतीय संविधानाच्या ३९५ कलमानुसार भारतीय व्यवस्था चालते. त्याची अंमलबजावणी अती अल्प आहे. ती ५० टक्के जरी अंमलबजावणी झाली तर भारतात एकही गरीब-दारीद्र्य रेषेत व भुकबळीत दिसणार नाही. संविधानाची १००% अंमलबजावणी झाल्यात. भारत देश विकसीत देश म्हणून लौखीक राहील.

## संदर्भ सूची :-

१) भारतीय अर्थव्यवस्था, प्रा.भारत पगारे प्रकाशक, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे, पेज क्र.११.
२) अर्थशास्त्रज्ञ, डॉ. बी.आर. आंबेडकर लेखक, प्रा.सोमवंशी बी.सी. प्रकाशन, आनंद प्रकाशन जयसिंगपूरा, औरंगाबाद, १४ एप्रिल-२०१२, पेज क्र.२७.
३) द प्रॉब्लेम ऑफ रुपी, डॉ.बी.आर. आंबेडकर अनुवाद, ॲड. मदन उके, प्रकाशन, तुलसी पगारे ७८०, वैशाली नगर, नागपूर, ६ ऑक्टोबर-२०११, पेज क्र.२८३.
४) आर्थिक विचारांचा इतिहास, लेखक - रायखेलकर, प्रकाशन : विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन-२००५, पेज क्र.२७९.
५) आर्थिक विचारांचा इतिहास, लेखक - रायखेलकर,प्रकाशन : विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन-२००५, पेज क्र.८५.
६) आर्थिक विचारांचा इतिहास, लेखक - रायखेलकर,प्रकाशन : विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन-२००५, पेज क्र.२७५.
७) आर्थिक विचारांचा इतिहास, लेखक - रायखेलकर, प्रकाशन : विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन-२००५, पेज क्र.२७७.
८) आर्थिक धोरण आणि नियोजन-डॉ.प्रभाकर देशमुख, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै-१९८९, पेज क्र.२८९.
९) अर्थशास्त्रज्ञ डॉ.बी.आर. आंबेडकर, प्रा.सोमवंशी बी.सी. आनंद प्रकशन, औरंगाबाद, एप्रिल-२०१२, पेज क्र-४९.
१०) भारतातील अर्थव्यवस्था-प्रा.भारत पगारे, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट-पुणे.
११) दै.मूलनिवासी नायक : संपादक : शांताराम ऋणशृंगारे, दि.२१/०४/२०१३.
१२) भारतातील अर्थव्यवस्था-प्रा. भारत पगारे प्रकाशक : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट-पुणे, पेज क्र.२०.
१३) भारतातील अर्थव्यवस्था-प्रा. भारत पगारे प्रकाशक : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट-पुणे, पेज क्र.२३.
१४) भारतातील अर्थव्यवस्था-प्रा. भारत पगारे प्रकाशक : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट-पुणे, पेज क्र.४५.
१५) भारतातील अर्थव्यवस्था-प्रा. भारत पगारे प्रकाशक : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट-पुणे, पेज क्र.४६.
१६) भारतातील अर्थव्यवस्था-प्रा. भारत पगारे प्रकाशक : मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट-पुणे, पेज क्र.२७.